Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October - 2020

**ISSUE No - CCXLVI ( 246 )**

# Ideology of Mahatma Gandhi

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director

**Guest Editor**
Dr. R.K.Ippar
Principal

**Executive Editor**
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

**Executive Editor**
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

**Executive Editor**
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

**Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmo S Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 20 | चलेजाव चळवळ आणि महात्मा गांधी — जमीर अकबर आवटे | 71 |
| 21 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहविषयक विचार — डॉ.प्रा.सौ. एस.पी. लाखे | 75 |
| 22 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार — नवनाथ नागरे | 82 |
| 23 | महात्मा गांधी आणि ग्रामविकास –एक आर्थिक अध्ययन — डॉ. नितेश रा. बोरकर | 86 |
| 24 | आर्थिक विपन्नवस्थेच्या गर्तेतून सावरण्यासाठी महात्मा गांधीजींचे वैचारीक तत्वज्ञान — डॉ.प्रा.रावसाहेब भिमराव नेरकर | 90 |
| 25 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहाविषयीचे विचार — प्रा.जया यशवंतराव बाविस्कर | 92 |
| 26 | महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचारांचे अध्ययन — श्री. राजकुमार तुकाराम राठोड | 97 |
| 27 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची विचारसरणी — प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई | 101 |
| 28 | गांधीवाद — डॉ. संजय गोपाळराव ठवळे | 106 |
| 29 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार — प्रा. सुरेश नारायण पाटील | 109 |
| 30 | महात्मा गांधीजीचे शिक्षणविशयक विचार — प्रा. सुमन साहेबराव बैसाणे | 113 |
| 31 | ग्रामविषयी महात्मा गांधी यांचे विचार — सुलोचना नि.चाटे | 118 |
| 32 | शैक्षणिक विचारक्रांतीचे महाजनक : महात्मा गांधीजी — डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक | 120 |
| 33 | महात्मा गांधी यांची सत्याग्रह संकल्पना : एक शोध — संध्या उद्धवराव करमनकर | 125 |
| 34 | महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार — डॉ.प्रा.पावडे के.डब्ल्यु. | 130 |
| 35 | महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार — प्रा.डॉ.संजय बाबुराव वाकळे | 133 |
| 36 | ग्रामीण विकासातील महात्मा गांधीजींचे योगदान — प्रा.संतोष बन्सीलाल राठोड | 135 |
| 37 | महात्मा गांधी एक सर्वज्ञा — डॉ. शंकर मारोती सावंत | 140 |
| 38 | मा .गांधी यांचा भारतीय शिक्षणाविषयक दृष्टिकोन –एक अभ्यास — डॉ आर आर पिंपळपले | 144 |
| 39 | महात्मा गांधीजीचे शिक्षणविषयक विचार — प्रा. ज्योती आधार चौधरी | 150 |
| 40 | महात्मा गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार — डॉ. एस.एम.सातपुते | 155 |
| 41 | सविनय कायदेभंग चळवळ व महात्मा गांधी — ज्योती अर्जुन शिंदे | 159 |
| 42 | गांधी विचार व खादी — डॉ. चंदन एम. बावलगावे | 163 |




Scanned by CamScanner

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal** | ISSN : 2278-9308
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 246 | October,2020

# महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार

**प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.**
इतिहास विभाग प्रमुख
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

*अहिंसा परमो धर्म।*

अहिंसा हे प्रचीन काळापासूनच भारतीय मानवी जीवनाचे व संस्कृतीचे जीवनभूत तत्व राहिले आहे. भारवासीयांच्या रक्तारक्तातच हे तत्व भिनलेले आहे. भारतीय वातावरणात या तत्वाचा प्राचीन काळापासूनच वावर राहिला आहे. साने गुरूजीच्या शब्दातच सांगायचे झाल्यास, 'येथील प्रत्येक व्यक्तीला आईच्या दुधाबरोबरच अहिंसेचे तत्व मिळत असते. भारतीय हवा म्हणजे अहिंसेची हवा.' भारतात जो श्वासोच्छवास करू लागेल त्याच्या जीवनात हळुहळु हे अहिंसा तत्व शिरल्याशिवाय राहणार नाही. असे हे 'अहिंसा परमो धर्म' हे तत्व भारतीवात एकाएकी भिनले नाही. त्यासाठी प्राचीन काळापासून ते आजतागायत अनेक भारतीयांनी यासाठी स्वतःला झिजवून घेतले आहे. या अहिंसा तत्वाला वेगवेगळ्या कालखंडात अनेकांनी अधिक धारता आनली आहे. या मध्ये भारतीय अहिंसेचे उपासक म्हणून ज्यांचा आग्रक्रमाणे उल्लेख केला जातो ते महात्मा गांधी. सदरील लेखात अशा या अनेक पैलू असणाऱ्या व्यक्तीच्या अहिंसे विषयक असणाऱ्या विचारांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार :**

महात्मा गांधी यांना अभिप्रेत असणारी अहिंसा ही आज आपण स्थूल मानाने मानतो तो अहिंसा नव्हे. अहिंसा म्हणजे कोणालाही मारावयाचे नाही हे यात आले. परंतु प्रत्येक कुविचार म्हणजे हिंसा होय. उताविळपणे वागणे म्हणजे हिंसा होय, मिथ्या भाषण म्हणजे हिंसा, अंगी दोष बाळगणे म्हणजे हिंसा होय. कोणाचे वाईट चिंतणे म्हणजे हिंसा. ज्याची लोकांना गरज आहे ते आपल्या ताब्यात नियंत्रणात ठेवणे म्हणजे हिंसा होय. एवढे मात्र सर्वांनी लक्षात घ्यावे की अहिंसेविना सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा व सत्य ही एकमेकांशी इतकी जखडलेली आहेत की, जशी काही नाण्याच्या दोन बाजू किंवा गुळगुळीत चकतीच्या दोन्ही बाजु त्यापैकी सुलटी कोणती अन् उलटी कोणती? तरी देखील अहिंसेला आपण साधन मानावे आणि सत्याला साध्य. साधन आपल्या हातातील गोष्ट आहे. म्हणूनच अहिंसा ही परम-धर्म झाली. सत्य म्हणजे परमेश्वर मानले तर ते प्राप्तीसाठी साधनाची काळजी घेतली तर कधीना कधी तरी सध्याचे दर्शन घडेलच एवढा जरी आत्मविश्वास बाळगला तर सबंध जग जिंकले. आपल्या मार्गातील वाटेल तितकी संकटे सोसवत बाह्यतः पाहता आपल्याला वाटेल तितके अपयश येताना दिसेल तरीही आपण विश्वास न सोडता एकच मंत्र जपत असाव तो हा सत्य आहे, तेच एक आहे.[1] सत्य हाच परमेश्वर त्याचा साक्षात्कार करण्याचा एकच मार्ग, एकच साधन म्हणजे अहिंसा. त्याच्याकडे कदापी ही पाठ फिरवणार नाही. ज्या सत्यरूपी परमेश्वराच्या नावाने ही प्रतिज्ञा केली तोच परमेश्वर त्याचे पालन करण्याचे बळ देवो.- अशा या अहिंसा साधनाचा महात्मा गांधीना साक्षात्कार कसा झाला या विषयी महात्मा गांधी म्हणतात, 'चंपारण्यात सत्याग्रहासाठी राष्ट्रीय सभेच्या वतीने कोणत्याही गुप्त किंवा प्रसिद्ध हस्तकांमार्फत कसलीही भूमिका तयार करण्यात आली नव्हती. त्यावेळी हजारो लोकांमध्ये प्रवेश करण्याची शक्ती राजकुमार शुक्लांमध्ये नव्हती. त्यापैकी कोणीही अजुनपर्यंत राजकिय काम केलेलेच नव्हते. एवढेच काय त्यांना चंपारण्याबाहेरच्या दुनियेची त्यांना खबरही नव्हती. असे असतांनाही माझी भेट जुन्या मित्राप्रमाणे झाली. यामध्ये मला ईश्वराचा, अहिंसेचा साक्षात्कार झाला असे म्हणण्यात अतिशयोक्ती तर नाहीच पण ते अक्षरक्षः सत्य आहे. हा साक्षात्कार करण्यासारखा माझ्या अंगी अधिकारतरी कोणता होता. याचा जेंव्हा मी विचार करतो तेंव्हा लोकांबद्दल प्रेमाशिवाय मला दुसरे काहीच दिसून येत नाही. हे प्रेम म्हणजे अहिंसा यावर माझ्या मनात बसणारी अढळ श्रद्धा होय.'[2] या अहिंसेच्या बळावरच गांधीनी अपरिचित असणाऱ्या चंपारण्यातील सत्याग्रह यशस्वी करून दाखविला. तेथुन पुढेही गांधीनी याच मार्गाचा अवलंब करीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा मार्ग सुखकर केला.

Scanned by CamScanner

महात्मा गांधीनी जो अहिंसेचा मार्ग स्विकारला होता तो फक्त भारतीय स्वातंत्र्य लढ्या पुरताच मर्यादित नव्हता. त्यांना मानवी जीवनात हा मार्ग प्रत्येकाने स्विकारावा असेही वाटे. विद्यार्थांच्या बाबतीत या मार्गाचे महत्व त्यांच्या पुढील विचारातून स्पष्ट होते. युवक-युवतीमधूनच राष्ट्राचे भावी पुढारी निर्माण व्हावयाचे आहेत. दुर्देवाने त्यांच्यावर नाही नाही तसल्या वातावरणाचा प्रभाव पडताना दिसतो. अहिंसेचे आकर्षण त्यांना क्वचित वाटते. ठोशास ठोसा किंवा एकास दोन ठोसे हा न्याय सहज पटण्यासारखा असला तरी पशुपक्षातील किंवा मानवी प्राण्यातील युद्धाच्या वेळी आपल्या दृष्टीस पडणारा हा पाशवी शक्तीचा कधीही न संपणारा चुरशोचा सामना आहे.[3] त्यामुळेच अहिंसेच्या यथायोग्य आकलनासाठी धिमेपणाने संशोधन करण्याची गरज आणि त्यापेक्षा कितीतरी पटीने अहिंसेसाठी कष्ट करण्याची व कष्ट सहन करण्याची क्षमता ठेवून अहिंसेचे आचरण करण्याची जरूरी असतं असं महात्मा गांधीना वाटते. अशा प्रकारे सत्याचा, अहिंसेचा मार्ग जितका सरळ तितकाच बिकट आहे. तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा तो आहे. डोंबाऱ्याच्या खेळातील दोरीवरून डोंबारी सरळ नजर ठेवून चालत जातो. त्या दोरीवरून चालण्यापेक्षाही हा सत्य, अहिंसेच्या दोरीवरून चालण्याचा मार्ग बारीक व अवघड असतो. ज्याप्रमाणे डोंबाऱ्याची नजर चुकल्यास तो दोरीवरून कोसळतो. त्याचप्रमाणे अहिंसेच्या मार्गावरून चालत असतांना जराशी जरी गफलत झाली की आपण खाली कोसळलो म्हणून समजा.[4] प्रतीक्षणी साधना केल्याने अहिंसेचे दर्शन घडणार या जिज्ञासुने अहिंसेचा शोध लावला.

महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांनी यासाठी अहिंसा मार्गाचा स्विकार केला होता. या लढ्याविषयी महात्मा गांधी म्हणतात, 'यदी भारत तलवार की निती अपनाये तो वह क्षणस्थायी विजय पा सकता है। लेकीन तब भारत मेरे गर्व का विषय नही रहेगा। मै भारत की भक्ती करता हूँ क्युंकी मेरे पास जो कुछ भी है वह सब उसीका दिया हुआ है। मेरा पुरा विश्वास है की उसके पास सारी दुनिया के लिए एक संदेश है। उसे युरोप का अंधानुकरण नही करणा है। भारत के द्वारा तलवार का स्विकार मेरी कसौटी की घडी होगी। मै आशा करता हूँ की उस कसौटी पर मैं खरा उतरूँगा। मेरा धर्म भौगोलिक सिमाओं से मर्यादित नही है। यदी उसमे मेरा जीवीत विश्वास है तो वह मेरे भारत प्रेम का भी अतिक्रमण कर जायेगा। मेरा जीवन अहिंसा धर्म के पालन द्वारा भारत की सेवा के लिए समर्पित है।'[5] अशा प्रकारे भारताच्या दृष्टीने गांधीनी अहिंसेचे महत्त्व विषद केले आहे. त्यांना अहिंसा सोडून भारतीयांनी स्वातंत्र्य मिळविणे हे मान्य नव्हते. कदाचित तलवारीच्या जोरावर भारताला स्वातंत्र्य मिळाले असते. भारत सोडण्यासही तयार होते. स्वातंत्र्याबरोबरच नव भारताच्या निर्मितीसाठी ज्या काही नवसुधारणांची, कारखानदारीची आवश्यकता होती त्यातही महात्मा गांधीना अहिंसा महत्वपूर्ण वाटे. याविषयी गांधी म्हणतात, कारखानदारी सुधारणेच्या पायावर अहिंसेची स्थापना करता येणार नाही पण स्वयंपूर्ण गावांमध्ये अहिंसा चांगली नांदेल, ग्रामीण संपत्ती उत्पादनाची माझी जी कल्पना आहे तिच्यामध्ये शोषणाला मुळीच वाव नाही. आणि शोषण हे तर हिंसेचे सर्वस्व आहे. म्हणून अहिंसक होण्यापूर्वी ग्रामीण बणने आवश्यक आहे.[6] अगदी काटेकोर तर्कशुद्ध पद्धतीने बोलायचे म्हणजे कोणतीही क्रिया किंवा उद्योग थोडीतरी हिंसा केल्याशिवाय शक्य होणार नाही. मग कितीही लहान का असेना. खुद्द आपली जगण्याची क्रिया ही देखील थोड्याबहुत हिंसेशिवाय अशक्य होईल. आपल्याला जे करावयाचे आहे ते ऐवढेच की अशी हिंसा कमीत कमी व्हावी. हे सर्व अहिंसेवर मनापासुन श्रद्धा असल्याशिवाय शक्य होणार नाही.

महात्मा गांधीच्या अहिंसा विषयक विचाराचे महत्त्व साने गुरूजींनी आपल्या दिल्ली डायरी या पुस्तकात लिहिले आहे. यातील एका प्रसंगामध्ये निर्वासित छावण्यांमध्ये कुराणातील प्रार्थना म्हणायला कुणीतरी आक्षेप घेतला तेंव्हा ठरल्याप्रमाणे प्रार्थना व प्रार्थनेत्तोर भाषणे होणार नाहीत असे सांगितले गेले परंतु जमलेला समुदाय गांधीच्या दर्शनावाचुन निघुन जाण्यास तयार नव्हता. अखेर गांधीजीनी व्यासपिठावर येऊन त्यांना पुढीलप्रमाणे सांगितले, 'प्रार्थनेला कोणी विरोध करणे बरे नाही. विशेषतः अशा खाजगी जागेत येऊन विरोध करणे शोभत नाही. परंतु एकानेही आक्षेप घेतला तरी तो मान्य आहे असे माझी अहिंसा सांगते. बाकी सारे अनुकूल असले तरी एकाचा आहे ना विरोध? जाऊ दे नका. परंतु समजा अधिकांश लोकांचा विरोध असता तर मी सारा त्रास सहन करून प्रार्थना म्हटली असती. ते माझे कर्तव्य ठरले असते. परंतु एकाच्या आक्षेपासाठी सर्वांची निराशा व्हावी हे तरी बरे का? असा ही प्रश्न उभा राहतो. उपाय सोपा आहे. जर बाकीचे सारे शांत राहतील त्या एका आक्षेपाबद्दल कोणी मनात क्रोध धरला नाही तर प्रार्थना करणे माझा धर्म ठरेल.'[7] हा अहिंसेचा असा मार्ग महात्मा गांधीना अभिप्रेत होता.

वरीलप्रमाणे एकंदरीत महात्मा गांधीचे अहिंसाविषयक विचार होते. त्या अहिंसेच्या स्विकाराचे ही मार्ग त्यांने सांगितले आहे. यावरून त्यांच्या सारखा अहिंसेचा उपासक दुसरा कोणी शोभत नसला तरी त्यांनाही आश्रमात वानर मारावे लागले.



Scanned by CamScanner

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal** | ISSN : 2278-9308
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 246 | October,2020

पिसाळलेली कुत्रे मारावी लागली, प्लेग आला असता उंदिर-घुशी मारण्याचा उद्देश कष्टाने त्यांना करावा लागला. त्यावेळेस त्यांनी जे लिहीले होते ते किती हृदय पिळवटून लिहीले होते 'माझ्या इतकाच पिसवा-डासांना, उंदिर-घुर्शींना जगण्याचा अधिकर आहे. माझ्या मरण्याने त्यांना जगु द्यावे असे वाटते, माझ्या हृदयात अनंत वेदना होत आहेत.' अशा अर्थाचे करून उद्गार होते.[8] महात्मा गांधी यांनी पिसाळलेली कुत्रे मारली, प्लेग सारख्या आजाराचा फैलाव करणारे उंदिर मारले. त्याप्रमाणे या स्वभावाची माणसे का मारली जाऊ नयें असे अनेकांना वाटेल. परंतु हे ही लक्षात ठेवावे लागेल की, कुत्रे मारताना गांधीजींचे हृदय पिळवटत होते. स्वतः मरून जाऊन कुत्रा जगु द्यावा असे त्यांना वाटत होते. एवढेच नव्हे तर कुत्रा मारणे यात प्रौढत्व न समजता त्यात ते दुबळेपणा व स्वतःच्या जीवनाची आसक्ती समजत होते. थोडक्यात आजच्या घडीला अहिंसा म्हणजे ज्यात हिंसेला स्थान नाही. दुसऱ्याच्या श्रमाचे अथवा श्रमफलाचे शोषण नाही आणि इतरांचा मत्सरालाही वाव नाही.

**संदर्भग्रंथ :**

1. महात्मा गांधी : महात्मा गांधी विचार संग्रह, रिया पब्लिकेशन्स कोल्हापुर, (पृ.क्र. 91)
2. मोहनदास करमचंद गांधी : सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, रिया पब्लिकेशन्स कोल्हापुर, (पृ.क्र. 328)
3. मोहनदास करमचंद गांधी : विधायक कार्यक्रम त्यांचे रहस्य व स्थान, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद (पृ.क्र. 35)
4. महात्मा गांधी : महात्मा गांधी विचार संग्रह, रिया पब्लिकेशन्स कोल्हापुर, (पृ.क्र. 90)
5. संग्राहक आर. के. प्रभु : मेरे सपनोंका भारत गांधीजी, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद (पृ.क्र. 4)
6. मो. क. गांधी : पंचायत राज, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद (पृ.क्र. 19)
7. साने गुरूजी : दिल्ली डायरी, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद (पृ.क्र. 93)
8. साने गुरूजी : भारतीय संस्कृती, रिया पब्लिकेशन्स कोल्हापुर, (पृ.क्र. 211)

Scanned by CamScanner